# भाषेचे क्रमिक पुस्तक आणि भाषाशिक्षण : एक टिपण

सर्व मुले भाषा, आपापल्या घरांत, अगदी लहान वयांत ऐकून आणि बोलून शिकतात. घरच्या ( व आजूबाजूच्या वातावरणांतून येणारे शब्द त्यांना आपसूकच आत्मसात होतात. ते त्यांना कोणी शिकवीत नाहीत किंवा त्यांची परीक्षाही कुणी घेत नाहीत. मुले ऐकलेले शब्द आपल्या मनात (मेंदूत) साठवत जातात, आणि मुखाची भाषाखिडकी उघडली की, शब्दोच्चार करू लागतात. थोड्याच काळात, एक शब्दी – दोन शब्दी वाक्ये उच्चारू लागतात. वयाच्या तिसऱ्या वयाच्या अखेरीस अनेकशब्दी वाक्ये, एवढेच नव्हे तर, कधीही न ऐकलेली वाक्ये स्वतः तयार करून बोलतात. बोलण्याने, बोलत राहिल्याने एकीकडे बोलण्याचा सराव होतो, बोलण्यात सहजता येते आणि दुसरीकडे मुलांचा शब्दसंग्रहही वाढतो. रोज सहा-सात नवे शब्द आपल्या बोधनेत, मुले जाणतात, वापरून पाहतात आणि मेंदूमध्ये दीर्घकाळासाठी साठवून ठेवतात. तिसऱ्या –चौथ्या वयांतील मुलांची शब्दसंख्या सहजपणे चार-पाच हजारापर्यंत जाते. भाषा ही अशी नैसर्गिक पद्धतीने मुले आत्मसात करतात.

या प्रक्रियेत इतरांनी बोललेली भाषा ऐकून समजणे आणि आपल्याला समजलेला त्यातील आशय बोलण्याकरवी व्यक्त करणे या परस्परसंबंधित अशा दोन मूलभूत क्षमता, आपल्या आपणच विकसित करतात. त्यासाठी, अर्थातच, इतरांचे सहाय्य आपल्या गरजेनुसार, आपल्या उपलब्धतेनुसार घेतले जात असते. भाषा आत्मसात करण्याची ही सारी प्रक्रियाच नैसर्गिकरित्या घडून येत असते.

नैसर्गिकरित्या घडून येत नाही ती, शालेय वर्गामधील सुरुवातीची भाषा शिकण्याची प्रक्रिया. सहा वर्षाचे मूल प्राथमिक शाळेत प्रवेश करते तेव्हा त्याची, पहिली भाषा आत्मसात होण्याची प्रक्रिया झालेली असते. ऐकणे व बोलणे या क्षमतांचा बऱ्यापैकी विकास झालेला असतो. परंतु प्राथमिक शाळेच्या दुसऱ्या इयत्तांमध्ये, या क्षमतांच्या जाणीवपूर्वक करावयाच्या पुढील विकासाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित केले जाते. त्याची काही आता गरजच नाही असे मानले जाते; किंवा त्याविषयी काही ठोस विचारच अस्तित्वात नसतो. त्यामुळे ऐकणे व बोलणे, त्यांतही प्रामुख्याने ‘बोलणे’ या क्षमतेचा पुढे आवश्यक असणारा विचार थोपविला जातो. स्पष्ट बोलणे, सहजस्फुर्त बोलणे, संभाषण-भाषण करता येणे, प्रश्न विचारता येणे, वर्गव्यवहारात शिक्षकवर्ग, इतर वर्गमित्र यांच्याशी संवाद करणे, अनोळखी माणसाशी बोलता येणे, अशी एक ना अनेक भाषिक क्षमता-कौशल्ये विकसित व्हायला हवीत अशा वयात, मुलांना याबाबतींत संधीच पुरवल्या

जात नाहीत. परिणामतः बोलण्याच्या क्षमतेचा विकास पुरेशा वेगाने वेळेवर होत नाही. त्यामुळे शाळेत दहा वर्षे शिकूनही मुले धीटपणे, आत्मविश्वासपूर्वक बोलायला शिकलेलीच नसतात.

असे का घडते? शालेय स्तरावर भाषा शिक्षण हे क्रमिक पुस्तकात बंद झालेले असते आणि ते फक्त ठराविक प्रश्नांच्या ठराविक उत्तरांकरवी अभिव्यक्त होत असते. मिळत असलेल्या अनुभवांची भाषिक अभिव्यक्ती होणे, ती विविधांगी अनुभवांची विविध पद्धतीने होणे याला आकाश मोकळे नसते. जी काही मुलांची भाषावृध्दी होते ती शाळेतल्या फावल्या वेळांत आणि मित्र-मैत्रिणींच्या गराड्यात. म्हणजे ती शालेय शिक्षणाचा भाग असत नाहीत.

शालेय शिक्षणातील पहिली दोन वर्षे, प्रामुख्याने, लेखन व वाचन या भाषिक कौशल्यांच्या विकासासाठी मुक्रर केलेली असतात. मुलांना अर्थपूर्ण वाचन सहज प्रवाहाने करता येणे आणि शास्त्रशुद्ध लेखन करता येणे ही दोन भाषिक उद्दिष्टे समोर ठेवलेली असतात. ही दोनही केवळ ‘कौशल्ये’च नसतात तर ती शाळेत आणि पुढील आयुष्यात आपणहून शिकण्याची पायाभूत साधने असतात. केवळ शालेय पातळीवर पाहिले तरी, शालेय विषय शिकण्याची लेखन-वाचन ही अत्यावश्यक अट असते. लिहिता-वाचता येत नाही म्हणून इतर विषय नीट शिकता येत नाहीत व मुलांची शालेय कामगिरी निम्न स्तराचीच राहते अशी मुले ‘ढ’ मानून नाकारली जातात.

वास्तविक, लेखन आणि वाचन या दोनही गोष्टी शिकणे याची खूप मोठी गुंतागुंतीची प्रक्रिया असते, ती सहजतेने आकाराला येणे हे मूलतः कशा पद्धतीने आपण शिकवतो, यावर अवलंबून असते. शाळेत, भाषेव्यतिरिक्त असणारे अन्य विषय, त्यांमधील वेळोवेळचा ‘आशय’ आत्मसात करून शिकायचे असतात. त्यासाठी क्रमिक पुस्तके युक्त ठरतात. भाषेच्या बाबतीत मात्र वेगळी परिस्थिती असते. येथे पुस्तकातील धड्यांचा आशय केवळ आनुषंगिक असतो, मुख्य असते ते भाषा सर्वांगांनी शिकणे हे. परीक्षेसाठी, क्रमिक पुस्तकातील धड्यांवरील प्रश्नोत्तरे पाठ करून, गुण मिळवता येतात, पण भाषेतील लेखन-वाचन ही कौशल्ये प्राप्त होणे आणि बोलण्याचे विविध पैलू अंगिकारले जाणे, या गोष्टी क्रमिक पुस्तकाधारित भाषा शिक्षण होऊ देत नाहीत.

भाषेच्या क्रमिक पुस्तकांतून मुख्यतः धडे, कविता असे गद्य-पद्य वाङमय असते. शिक्षणाच्या सुरुवातीच्या कालात वाङमयाकरवी भाषिक कौशल्यांकडे हा मार्ग फारसा स्पृहणीय वाटत नाही. ‘भाषा’ म्हटले की, त्यातील फक्त ‘वाङमय’ डोळयांसमोर येण्याची गरज नाही. भाषा ही व्यापक गोष्ट आहे, वाङमय हा तिचा

एक महत्त्वाचा आणि सुंदर भाग आहे. पण ते, सुरुवातीच्या भाषा आकलनासाठी दुबळे साधन आहे असे वाटते. मुलांचा भाषाविकास ही एक वेगळीच गोष्ट धरायला हवी. भाषाविकासाकडून वाङमयाच्या आस्वादाकडे जाणे हितकारक ठरते. वाङमयाकरवी भाषाविकास यापेक्षा भाषाविकासातून वाङमयाच्या स्टेशनवर उतरणे इष्ट ठरते.

वाङमयांतून भाषाशिक्षण करणारे क्रमिक पुस्तक टाळले तर त्याऐवजीचा मार्ग कोणता?

भाषा ही पुस्तकांतून असतेच पण त्यापेक्षा अधिक ती दैनंदिन जीवनव्यवहारांत असते. पुस्तकातील वाङमयापेक्षा जीवनव्यवहारातील ‘वाङमया’चा, म्हणजे अनुभवांचा वापर सुरुवातीच्या भाषाशिक्षणात अधिक उपयुक्त आणि अधिक प्रभावी ठरतो. शैक्षणिकदृष्ट्या सुद्धा तो अधिक स्वीकारार्ह ठरतो. दैनंदिन जीवनातील अनुभव घेणे, त्याचे रूपांतर भाषिक अनुभवांत केले जाणे आणि त्यांकरवी लेखन-वाचनाकडे वळणे, हे प्रत्यक्ष भाषा आणि इतरही शालेय विषय शिकणे यासाठीचा प्रशस्त मार्ग आहे.

मुलाचे घर, त्याच्या आजूबाजूचा परिसर, परिसरांतील ओळखीच्या व्यक्ती, वस्तूरूप भौतिक जग, या जगांतील विविध प्रकारच्या घटना यांचा सारा व्यापक पसारा असा असतो की, शिकणारे मूल, यांकरवी आपले सहज शिक्षण करीतच असते. या त्याच्या ‘सहज शिकण्या’ला शालेय वर्गात आणता येते आणि लेखन-वाचनाची कौशल्ये शिकण्यासाठी त्यांना जुंपता येते.

माणसाची भाषा हा ज्याच्या त्याच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. भाषा ही संस्कृतीतून जन्म घेते, संस्कृतीतच विकास पावते, आणि म्हणून ती संस्कृतीतूनच आत्मसात करता येते. अगदी लहान वयात, अगदी नजिकच्या संस्कृतीतूनच मुले भाषा अगदी कोणीही न शिकवता, आत्मसात करीत असतात. शिकणाऱ्या मुलांच्या नजिकचा सांस्कृतिक परिसर ही भाषानुभवांची जिवंत खाण असते. मुलांना आपल्या भाषिक अनुभवांकरवी अगदी सहजतेने लिहिण्या-वाचण्याच्या कौशल्यांकडे नेता येते. हा मार्ग अगदी स्वाभाविक असा असतो. क्रमिक पुस्तकातील वाङमयीन मार्ग हा तसा कृत्रिमच असतो.

माणसाचा शिक्षणाकडून जीवनाकडे जाण्याचा मार्ग हा हा गल्लीवजा असतो; जीवनाकडून शिक्षणाकडे जाण्याचा मार्ग हा प्रशस्त असा हायवे असतो !

❖